अंक ७ : मार्च २०१३

# समजदार जोडीदार

सेंटर फॉर हेल्थ अँड सोशल जस्टिस - पुणे, गावपातळीवरील जनजागृती व खाजगी वितरणासाठी प्रकाशित

## “पूर्वी मी माझ्या पत्नीच्या भावना, मते व विचार जाणून घेतच नव्हतो.”



ही कथा आहे श्री राजेश बोरजे, विवाहीत गट सदस्य, करंदी यांच्या मधील वैयक्तीक बदलाची. नारी समता मंचचे प्रेरक विजय कव्हे यांच्या सोबत गावामध्ये सक्रीय आहेत.

‘समजदार जोडीदार’ प्रकल्पामध्ये सहभागी होण्यापुर्वी मी माझ्या पत्नीला किरकोळ कारणांवरून शिवीगाळ व मारहाण करीत होतो. दारू पिल्यामुळे आमच्या दोघांमध्ये भांडणे होत होती. घरातील सगळी कामं करून घेण्यासाठीच तीला मी लग्न करून आणलंय, असाच माझा विचार होता. एक नवरा म्हणून मी माझ्या पत्नीच्या भावना, तिचे विचार, मते कधी जाणूनच घेतली नाहीत.

समजदार जोडीदार प्रकल्पामध्ये गटसदस्य म्हणून सहभागी झाल्यावर मला समजदार जोडीदाराचा खरा अर्थ समजला. प्रकल्पाच्या गट बैठकी इतर कार्यक्रमामुळे मला महिलांवरील हिंसा, हिंसेचा महिलांच्या आरोग्य व मानसिकतेवर होणारा परिणाम याविषयी माहिती मिळाली. त्याचबरोबर हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा अधिकार आहे, हे मला कळून चुकलं व माझ्याकडून माझ्या पत्नीला होणारी शिवीगाळ, मारहाण व तीला दिली जाणारी दुय्यम वागणूक मी थांबविली पाहिजे, हे माझ्या लक्षात आलं. मला माझ्या वागण्यामध्ये व विचारामध्ये सुधारणा करावी लागेल, हयाची जाणीव झाल्यामुळे मी माझ्या पत्नीला आता शिवीगाळ, मारहाण, करीत नाही. मी दारू पिणंही सोडून दिलं आहे. नवरा बायकोचं नातं हे मैत्रीचं असावं, हयाची जाणीव झाली. पुर्वी पत्नीला मारहाण, शिवीगाळ करताना मी चुकीचं करतोय असं कधी वाटतचं नव्हतं. आता माझ्या पुर्वीच्या वागणूकीविषयी पत्नीला विचारल्यावर ती म्हणते की तुम्ही शिव्या दिल्यावर, मारल्यावर मला तुमचा राग यायचा. माझ्यातील बदलामुळे आमच्या दोघांच्या बोलण्यामध्ये सहजता जाणवू लागली आहे. बदल चांगला वाटतोय. आम्ही दोघंही कोणत्याही गोष्टी एकमेकांसोबत शेअर करायला लागलोय.

## “होय, घरकाम ही पुरूषांचीपण जबाबदारी आहे.”

ही कथा आहे हॅलो मेडीकल फाऊंडेशन या संस्थेचे दर्शनाळ गावचे प्रेरक श्री शशिकांत दबडे यांचे मधील वैचारीक व वर्तणूकीतील बदलाची.

‘समजदार जोडीदार’ प्रकल्पामध्ये येण्यापुर्वी मी कधीही घरगुती काम करत नव्हतो, पत्नीशीही व्यवस्थीतपणे न बोलता उध्दटपणे बोलायचो. मला माझ्या अशा वागण्यामध्ये काहीच चुकीचं वाटत नव्हतं, कारण मला वाटायचं की घरगुती कामं ही महिलांचीच जबाबदारी असून ती त्यांनीच पार पाडली पाहिजे. पत्नीला अपशब्द वापरणे किंवा ओरडने, उध्दटपणे बोलणे ही हिंसा नाही असंच वाटायचं.

पण समजदार जोडीदार प्रकल्पाच्या माध्यमातुन

**पुरूषीपणा सोडू या - माणूस म्हणून जगूया.**

मिळालेले प्रशिक्षण, गट बैठकींमुळे मला महिलांवरील हिंसा, त्यांचे महिलांवर होणारे परीणाम, महिलांवर असणारा कामाचा ताण हे समजलं. त्यामुळे घरकाम ही केवळ महिलांचीच जबाबदारी असते हा माझा गैरसमज दुर झाला. मी आता घर झाडणे, पाणी आणणे ही कामे करीत आहे. माझ्या पत्नीवरील कामाचा ताणही थोडया प्रमाणात कमी झाला आहे. एकमेकांना मिळणाऱ्या आधारामुळे आता आम्हा दोघांनाही रिलॅक्स वाटंत आहे.



## “मुलींवर होणाऱ्या संभाव्य छळाविरूध्द गट सदस्यांमार्फत कृती.”

ही कथा अस्तित्व संस्थेचे संगेवाडी गावचे प्रेरक श्री नितीन वाघमारे व त्यांच्या गट सदस्यांनी मुलींवरील छळाविरोधी केलेल्या कृतीची आहे.

संगेवाडी गाव हे सांगोलापासून १५ ते १६ कि.मी अंतरावर आहे. संगेवाडी तून काही मुलं व मुली महाविद्यालयीन शिक्षणासाठी दररोज एस.टी किंवा खाजगी जीपने मांजरी व सांगोल्याला जातात. पण बऱ्याचवेळा एस.टी. च्या फेऱ्या कमी असल्यामुळे खाजगी जीपनेच प्रवास करावा लागत होता. एके दिवशी काही मुलांकडून प्रेरक नितीन वाघमारे व काही गटसदस्यांना समजलं की काही जीपवाले गावातील ठराविक मुलींकडून प्रवासाचे पैसे घेत नव्हते. काही वेळा प्रवासाच्या भाडयापेक्षा कमी पैसे घेत होते. गावाच्या थांब्यावर गाडी थांबवतानाही ते मुलींच्या गटासमोरच थांबवत असत. ड्रायवर्स मुलींसोबत जवळीकता वाढविण्याचा प्रयत्न करीत होते.

एकेदिवशी प्रेरक, गटसदस्य व गावातील प्रमुख व्यक्तिंनी जीप बंद आंदोलन करून त्यादिवशी खाजगी जीप्स गावाच्या थांब्यावर थांबवून दिल्या नाहीत. तसेच गावातील कुणीही त्यादिवशी खाजगी जीपने प्रवास केला नाही. ज्या मुलींसोबत खाजगी जीपवाले जवळीकता वाढविण्याचा प्रयत्न करीत होते त्या मुलींनाही जीप ड्रायव्हरांचा त्यांच्याशी जवळीक वाढवण्याचा हेतू समजावून सांगीतला व कुणीही त्यांना बळी पडू नये याची काळजी घेण्यास सांगितले.

तसेच मांजरीतील महाविद्यालयात जावून शिक्षक व विद्यार्थ्यांना या प्रकाराविषयी माहिती देवून कुणाच्या अशा प्रकारच्या तक्रारी असतील तर आमच्याकडे देण्याची विनंती केली. तसेच सांगोला एस.टी.डेपो व्यवस्थापकांना भेटून त्यांना गाडयांची संख्या वाढविण्यासाठी निवेदन दिले. या निवेदनामुळे डेपो व्यवस्थापकांनी सांगोला डेपोच्या सर्व चालकांना मांजरी येथे बसेस थांबविण्याचा आदेश दिला आहे. यामुळे खाजगी जीप चालकांची वागणूक पण आता सुधारत आहे.

## “शासकीय आरोग्य सेवांचा लाभ मिळवून दिल्याचा आनंद....”

ही कथा युवा ग्राम केज या संस्थेचे हनुमंत पिंपरी या गावचे प्रेरक श्री मनोज गायकवाड यांनी गावातील महिलेला जननी सुरक्षा योजनेचा लाभ मिळवून दिल्या बद्दलची आहे.

माझ्या गावातील एका महिलेचे बाळंतपण होऊन तीन महिने झाल्यावरही जननी सुरक्षा योजनेचे पैसे मिळाले नव्हते. ती जननी सुरक्षा योजनेचा लाभ घेण्यास पात्र असूनही तीच्याकडे जात प्रमाणपत्र नसल्यामुळे योजनेचा लाभ मिळण्यास अडचण येत होती. मी स्वतः ग्रामसेवकाकडे जावून तिला जात प्रमाणपत्र मिळवून दिलं. तसेच ए.एन.एम.व लाभार्थी महिलेचे कुटुंब यांचा संवाद घडवून आणला. त्यानंतर दोन दिवसांनी त्या महिलेस रू. ७००/- जननी सुरक्षा योजनेतून मिळाले.

एन.आर.एच.एम. वर मिळालेल्या प्रशिक्षणामुळे मला या योजनेची माहिती झाल्याने मी हे करू शकलो.

**नका करू लिंग निदान, मुलगीपण आहे देशाचा अभिमान .**

## “ एन.आर.एच.एम. वरील प्रशिक्षणामुळे गावातील पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत.”

ही कथा युवा ग्राम, केज या संस्थेचे सारणी गावचे प्रेरक श्री गणेश सोनवणे व गट सदस्य यांनी केलेल्या कृतीचे आहे.

माझ्या गावातील गट बैठकीमध्ये एन.आर.एच.एम., ग्रामीण आरोग्य व स्वच्छता समितीची कार्ये व जबाबदारी यावर चर्चा करीत असताना असं समजलं की गावातील पिण्याच्या पाण्याची टाकी काही मागील आठ वर्षापासून धुण्यात आलेली नाही. तेव्हा गटाने ठरवले की याविषयी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामसेवक यांच्यांशी या विषयावर चर्चा करायची. मी व युवक गट सदस्यांनी मिळून ग्रामपंचायत सदस्यांना याविषयी माहिती दिली. ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामपंचयत शिपायाला सांगून पिण्याचे पाण्याची टाकी धुवून घेतली.

प्रशिक्षणामुळे ग्राम आरोग्य व स्वच्छता समितीच्या कामाची व जबाबदारीची स्पष्टता आल्यामुळे गावातील दुषित पाण्याचा प्रश्न सोडविता आला. सर्व गटसदस्यांनी एकत्र येवून टाकी धुण्याची मागणी केल्यामुळे आमच्या कृतीला यश मिळाले. गावातील लोकांनी आमच्या कृतीमुळे आमचे कौतुक केले व हा गट गावाच्या भल्यासाठी काहीही करू शकतो असं बोलून गौरव केला.

## “ महिलांच्या आरोग्यामध्ये पुरूषांची भागीदारी असावी याची जाणीव झाली.”

ही कथा सावित्रीबाई फुले महिला मंडळ या संस्थेचे घोडका राजूरी या गावचे प्रेरक श्री सुरेश बोचकुरे यांनी पत्नीच्या बाळंतपणामध्ये घेतलेल्या काळजी विषयी आहे.

मी माझी पत्नी पंचशिला वय ३० वर्षे हिला बाळंतपणासाठी माहेरी पाठविली. कारण माझी हालाखीची परिस्थीती होती. मला आई - वडील नसल्याने घरामध्ये प्रौढ माणसे कोणीही नव्हते. काही दिवसांनी मला पत्नीच्या घरच्यांचा फोन आला व सांगीतले की शिलाला आंबेजोगाईच्या सरकारी दवाखान्यामध्ये ॲडमिट केले आहे. हे ऐकताच मी त्याचवेळी आंबेजोगाईला निघालो व संध्याकाळी ४ वाजता दवाखान्यात पोहोचलो. तिथे गेल्यावर मला समजलं की शिलाला खूप ताप आला आहे. तिला खूप त्रास होत होता. डॉक्टर मला माझ्या पत्नीला भेटू देत नव्हते. रात्रीचे ८ वाजले तरी डिलीव्हरी होत नव्हती. तेव्हा मी डॉक्टरांची रात्री १२ वाजता भेट घेतली व काहीही करा पण माझ्या पत्नीला वाचवा अशी विनंती केली. माझ्या सासू व मेहूणी दोघींनी धीर सोडला होता व रडत बसल्या होत्या. बाळाचा श्वास दमला असल्याने डॉक्टरांनी सिझेरीअन करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी दुसऱ्या पेशंटचे सिझेरीअन रद्द करून अगोदर शिलाचे सिझेरिअन केले व बाळाला बाहेर काढून ताबडतोब २१ नंबर रूम मध्ये घेवून जायला सांगीतले. सासू व मेव्हणी बाळाला घेवून लहान मुलांच्या डॉक्टरांकडे गेल्या व मी पत्नीजवळ थांबलो. ऑपरेशन थिअेटरमधून बाहेर काढल्यानंतर वॉर्डमध्ये एकही खाट नसल्याने लवकर कोणी वॉर्डमध्ये घेत नव्हते. माझ्या पत्नीला खूप थंडी वाजत होती. त्यावेळी नर्स व गार्डसोबत भांडण करून मी पत्नीला खाट मिळवून दिली. दुसऱ्या दिवशी देखील माझ्या पत्नीची तब्येत बरी नव्हती. नेहमी तीचा रक्तदाब वाढायचा. मी तिचे पाय चेपायचो, कापडाने वारे घालायचो. पत्नीची सेवा करताना वॉर्ड मधील सर्व पेशंट व कर्मचारी माझ्याकडे बघत होते. काहीजण मला हसायचे. वीस - पंचवीस महिलांच्या वॉर्डमध्ये मी एकटाच पुरूष पत्नीसोबत हजर होतो. पत्नीची काळजी घेत होतो. आज माझी मुलगी दीड वर्षाची आहे, आम्ही आनंदात राहत आहोत. समजदार जोडीदार प्रकल्पामुळे माझा महिलांकडे बघायचा दृष्टीकोन बदलण्यास मदत झाली. माझ्या विचारांमध्येही बदल झाला. प्रशिक्षणामुळे मला महिलांच्या आरोग्यामध्ये पुरूषांची भागीदारी का व कशी असावी हे समजल्यामुळे मी माझ्या पत्नीची काळजी आजही घेत आहे.

**भाई भी घरमे हाथ बटाये, तभी तो बहना पढने जाए ।**



युएनएफपीए प्रतिनीधींची फिल्डव्हिजीट सोनलवाडी गाव - अस्तित्व ट्रस्ट, सांगोला



नव विवाहीत जोडप्यांचा मेळावा, हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अक्कलकोट



बोबडेवाडी येथील गटसदस्य सापशिडी खेळतांना, युवाग्राम, केज



युवक गट बैठक, जरूड गाव, एसपीएमएम, बीड



प्रेरकांसोबत मासिक बैठक - नारी समता मंच, पुणे

## संपादकीय

समजदार जोडीदार प्रकल्पाच्या या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये प्रत्येक भागीदार संस्थेच्या पातळीवर वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, जसे महिला हिंसा विरोधी मोर्चा, ओ.बी.आर. कार्यक्रम, प्रभातफेरी, वडील व मुलं यामधील नातेसंबंध सुधारण्यासाठी तसेच मुलांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी वडीलांची नक्की काय भूमीका असावी यासाठी बालक-पालक मेळावा, नवविवाहित जोडप्यांसाठी मार्गदर्शन, महिला - पुरुष मेळावा इ. कार्यक्रम आयोजीत करण्यात आले होते.

तसेच पुरुषांमधील झालेल्या बदलांच्या तसेच युवक व पुरुषांनी वेगवेगळया मुद्यांवर घेतलेल्या किंवा केलेल्या कृतीसंदर्भात जवळपास ५० कथा मिळाल्या आहेत त्यामधील ६ कथा या महिन्याच्या न्युज लेटरसाठी निवडण्यात आल्या आहेत. यामध्ये पुरूषांनी मुलींवरील हिंसा, छळ थांबविण्यासाठी केलेली कृती, महिलांच्या आरोग्य काळजीमध्ये व घरकामातील महिलांचा कामाचा ताण कमी करण्यासाठी घरकाम करणे ही पुरूषांचीही जबाबदारी आहे असे जाणून पुरुषांनी त्यात घेतलेल्या भागीदारीविषयी आहेत. तसेच जननी सुरक्षा योजनेचे पैसे मिळवून देणे व ग्रामीण आरोग्य व स्वच्छता समितीस कार्यरत करून पिण्याच्या शुध्द पाण्याचा प्रश्न सोडविण्यात पुरुष व युवकांनी घेतलेल्या पुढाकारा संदर्भात आहेत.

**संवाद, पालन - पोषण, देखभाल, हे पण आहे वडीलांचे काम.**